(33)

उपसा सिंचन योजनांच्या संकल्पनासाठी
मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन परिपत्रक क्र.मसंसं-०२०८/(८३/२००८)/मोप्र-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १२/१/२००९.

वाचा : शासन परिपत्रक क्र.मसंसं-०२०८/(८३/२००८)/मो.प्र.१, दिनांक २४/३/२००८.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यातील प्रवाही सिंचनापासून वंचित क्षेत्रासाठी जलसंपदा विभागांतर्गत मोठ्या प्रमाणात उपसा सिंचन योजना राबविण्यात येत आहेत. यापूर्वी उपसा सिंचन योजनांच्या नियोजन व संकल्पन विषयक धोरणात्मक निर्णय, शासन स्तरावरील या कामी विशेष गठित स्थायी समिती मार्फत घेण्यात येत असत. तथापि विविध पाटबंधारे विकासाच्या स्थापनेनंतर शासन स्तरावरील स्थायी समिती जुलै २००२ मध्ये संपुष्टात आली. तदनंतर उपसा सिंचन योजनांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रत्येक पाटबंधारे विकास महामंडळांच्या कार्यकारी संचालकांतर्गत स्वतःची स्थायी समिती गठन करण्यात आली.

उपसा सिंचन योजना तांत्रिक दृष्ट्या व्यवहार्य, आर्थिक दृष्ट्या किफायतशीर, सामाजिक दृष्ट्या स्वीकृत व पर्यावरणाच्या दृष्टीने टिकाऊ होण्यासाठी तसेच नियोजन व संकल्पनाबाबत एकसूत्रीपणा येण्यासाठी उपरोक्त शासन परिपत्रकान्वये सर्व पाटबंधारे विकास महामंडळासाठी काटेकोरपणे पाळण्यासाठी मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात आल्या आहेत.

मार्गदर्शक सूचना -

१. सर्व प्रकारच्या उपसा सिंचन योजनांच्या मान्यताप्राप्त लाभक्षेत्रासाठी संकल्पित विसर्ग हा सुधारित पेनमन पध्दतीने (१२ दिवस वहन कालावधी व २ दिवस बंद धरुन) येणाऱ्या महत्तम पंधरवाडी पाण्याच्या मागणीवर आधारित विसर्गाच्या ७० टक्के इतका घेण्यात यावा.
२. आवर्तन कालावधी १४ दिवस व १६ तास पंपींग करण्यात यावे.
३. अतिरिक्त पंपाची तरतूद करण्यात येऊ नये.
४. सर्व नियोजनाधीन उपसा सिंचन योजनांचे सर्वसाधारण आराखडे तांत्रिक व्यवहार्यतेच्या दृष्टीने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून तपासणीनंतरच सक्षम स्तरावर मान्यता घ्यावी.

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकात नमुद मार्गदर्शक सुचना क्रमांक २ (आवर्तन कालावधी १४ दिवस व १६ तास पंपींग करणे) या सुचनेचे पालन करताना क्षेत्रीय स्तरावर खालीलप्रमाणे अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

(१) सिंचनासाठी अखंडीत पाणीपुरवठा उपलब्ध होत नसल्याने कालव्याची वहन पातळी पुर्नस्थापित होण्यास अधिक वेळ लागत असून त्याचा विपरीत परिणाम नियोजित सिंचनावर होत आहे.

(२) बहुउद्देशीय योजनांचे सिंचन व्यवस्थापन कारण गुंतागुंतीचे होत आहे.

(३) संकल्पनाच्या परिगणनात अमल करताना पर्यायाने योजनांच्या किंमतीत वाढ होणे अपरिहार्य आहे.

(४) सगळयाच उपसा सिंचन योजनेसाठी उच्च दाबाचा वीज पुरवठा थेट विद्युत वाहिनीद्वारे केला जात असल्याने २४ तास पंपींग करणे शक्य आहे.

(५) पंपींग यंत्रणा दीर्घकाळ चालविणे शक्य असून प्रतिदिन चालु बंद करण्यापेक्षा दीर्घकाळ / अखंडीत चालविणे तांत्रिक दृष्ट्या, पंपींग यंत्रणेच्या दीर्घ आयुमानासाठी व्यवहार्य असुन कार्यक्षमतेच्या दृष्टीने योग्य आहे.

उपरोक्त परिस्थितीचा विचार करुन शासन परिपत्रक क्र.मसांसं-०२०८/(८३/२००८)/मो.प्र.१, दिनांक २४/३/२००८ मधील मार्गदर्शक सुचना क्र.२ मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

मार्गदर्शक सुचना क्र.२ - "१६ तास पंपींग व ५४ दिवस आवर्तन कालावधी ऐवजी २४ तास पंपींग व १४ दिवस आवर्तन कालावधी धरण्यात यावा".

(प्र.म.अलमाले)
शासनाचे उप सचिव

प्रत.

स्वीय सहायक, मा.मंत्री, जलसंपदा विभाग (म.कृ.खोरे विकास महामंडळ वगळून)
स्वीय सहायक, मा.मंत्री, जलसंपदा विभाग महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,
स्वीय सहायक, मा.राज्यमंत्री, जलसंपदा विभाग,
स्वीय सहायक, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
महासंचालक,संकल्पन, प्रशिक्षण व संशोधन, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक,
सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
सर्व तांत्रिक उप सचिव /अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उप अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
उप अभियंता, मोप्र-१ संग्रहार्थ,
कार्यासन मोप्र-१ संग्रहार्थ.